N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** संगमनेर शहर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1976 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/11/2020 01:07 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 31/10/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/11/2020
**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/11/2020 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/11/2020 00:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** थोरात क्रिडा संकुलन समोर,संगमनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** संगमनेर शहर

**District(State) (जिल्हा(राज्य)):** अहमदनगर(महाराष्ट्र)

पोलीस निरीक्षक संगमनेर शहर पो. स्टे.

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कैलास मधुकर आडगांवकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डी प्लाझा , थत्तेनगर ,3 रा मजला कलेजरोड , नाशिक,संगमनेर शहर ,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | डी प्लाझा , थत्तेनगर ,3 रा मजला कलेजरोड , नाशिक,संगमनेर शहर ,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9822333856

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पीएसआय राणा प्रतापसिंग परदेशी | | | 1. फ्लॅट नं , 34 , मटाले सोरासाय, कामटवाडारोड , नाशिक,संगमनेर शहर , अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | विशाल रविंद्र पावसे | | | 1. रा साई श्रध्दा चौक , संगमनेर,संगमनेर शहर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद संगमनेर शहर पोलीस ठाणे , दिनांक 3/11/2020 मी कैलास मधुकर आडगांवकर वय 42 वर्ष धंदा - सराफ व्यवसाय रा फलॅट न 301 , डी प्लाझा , थत्तेनगर , 3 रा मजला कलेजरोड , नाशिक मो.नं. 9 8223338566 समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहून फिर्याद लिहून देतो की माझे नाशिक रोड येथे दत्त मंदीर स्टपजवळ आडगांवकर ज्वेलर्स सराफ दुकान असून सदर दुकानाचा मी प्रोपरायटर आहे . दि . 23/10/2020 रोजी मी माझे नाशिकरोडचे दुकानावर असतांना संगमनेर शहर पोलीस स्टेशनचे पीएस आय श्री राणा परदेशी साहेबांधा माझे दुकानावर मला फोन आला व त्यांनी मला सांगितले की , संगमनेर सिटी पोलीस स्टेशनला चोरीचा गुन्हा दाखल झाला असून गुन्हयातील सोने तुमच्या दुकानात गहाण ठेवले आहे . तेव्हा तुमच्या कडे चौकशीकरीता आम्ही येणार आहोत तेव्हा तुम्ही दुकानातच थांबा . त्याप्रमाणे पीएसआय श्री राणा परदेशी याहेब माझे दुकानावर आले . त्यावेळी त्यांनी सांगितले की , अतिश डमरे यांनी त्यांचे स्वत:चे घरातून सोन्याचे दागिने चोरून तुमच्याकडे गहाण ठेवले आहे . आम्हाला ती रिकव्हरी करावी लागेल . तेव्हा मी गहाण ठेवल्याचे कागदपत्र व बील त्यांना दिले व त्यानंतर ते निघून गेले . दि . 27/10/2020 रोजी पीएसआय श्री राणा परदेशी हे सायंकाळी 8.00 वा नाशिक रोड येथील दुकानावर आले . त्यावेळी त्यांचे सोबत त्यांचे कर्मचारी व अतिश डमरे देखील होते . त्यावेळी मी त्यांना माझे दुकानात गहाण ठेवलेला दागिणा दिला . तेव्हा पीएसआय राणा परदेशी हे मला म्हणाले तुमचा या गुन्हयात सहभाग आहे चोरीची वस्तू तुम्ही घेतली आहे . तेव्हा तुम्हाला अटक करावी लागेल . तेव्हा मी त्यांना सांगितले की , दुकानातील माणसाने सोन्याचा दागिणा गहाण ठेवतांना अतिश डमरे यांचे मोबाईल फोनवरून त्यांचे वडीलांना फोन करून खात्री केली आहे . तसे गहाण खत पण बनिवले आहे . तेव्हा पीएसआय राणा परदेशी यांनी जर तुम्हाला अटक टाळायची असेल तर तुम्हाला 2 लाख रूपये दयावे लागतील असे म्हणून मला दि . 2 9 / 10 / 2020 रोजीची हजर राहण्याची समज देवून निघून गेले . त्यानंतर त्यांनी मला दि . 2 9 / 10 / 2020 रोजी सकाळी फोन करून तुम्ही दि . 31/10/2020 रोजी संगमनेर शहर पोलीस स्टेशनला हजर रहा असे सांगितले . तरी पीएसआय राणा परदेशी यांना मला 2 लाख रुपये देण्याची इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , नाशिक येथे कळविले होते . त्याप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , नाशिक कडील पोलीस उपअधीक्षक श्री विजय जाधव यांनी मला दिनांक 31/10/2020 रोजी 11:00 वाजता अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय , नाशिक येथे हजर राहण्याबाबत सांगितले होते त्याप्रमाणे मी अँन्टी करप्शन ब्युरो , नाशिक कार्यालयात हजर झाल्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री



Scanned with CamScanner

विजय जाधव यांनी त्यांची स्वतःची , पंच श्री . अमोल तुकाराम वराडे व श्री . तुषार मधुकर खैरनार तसेच सापळा पथकातील पोना डोंगरे व पोना प्रणय इंगळे वचालक पोहवा गांगुर्डे अशाचा परिचय करून देवुन माझाही परिचय सर्वाना करून दिला . त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री जाधव यांनी पंचासमक्ष मला माझे तक्रारी बाबत विचारले असता त्यांना मी माझी वरील प्रमाणे तक्रार सांगुन माझी वरील प्रमाणेची तक्रार लिहुन त्यावर सही केल्यानंतर सदर तक्रारीवर पोलीस उपअधीक्षक श्री जाधव व पंचांनी सहया केल्या . त्यानंतर लागलीच तकारीप्रमाणे माझेकडे लाचेची मागणी होते अगर कसे ? याबाबत खात्री करणेअसल्याने पंच व सापळा पथकातील कर्मचारी अशांना आवश्यक त्या सर्व सुचना देवुन कारवाई कामी आवश्यक साहीत्यासह पोलीस उप अधिक्षक श्री जाधव असे शासकिय वाहन क्रमांक- एमएच 15 अ अ 0177 ने व मी माझेकडील चारचाकी वाहन क्रमांक एम एच 15 जीओ 4000 ने अँन्टी करप्शन ब्युरो , नाशिक कार्यालयातुन रवाना होवुन द्वारका , नाशिक रोड मार्गे संगमनेर येथे जावून बस स्टण्डचे मध्ये बाजूला वाहन थांबवीले , त्यानंतर माझे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे संगमनेर शहर पोलीस स्टेशनचे पीएसआय राणा परदेशी हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच न . 1 श्री . वराडे अशांना पोलीस उपअधीक्षक श्री जाधव यांनी योग्य त्या सुचना देवुन , व्हाईस रेकर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते माझेकडे देवुन मला पंच नं . 1 श्री . वराडे यांचेसह भाझेकडील वाहनाने संगमनेर बस स्टण्ड येथुन संगमनेर शहर पोलीस स्टेशनचे पीएसआय राणा परदेशी यांच्या भेटी करीता रांगमनेर शहर पोलीस स्टेशन येथे त्यांचे भेटीकरीता रवाना केले . त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री विजय जाधव , पंच न . 2 श्री . खैरणार व सापळा पथक असे संगमनेर बस स्टण्ड समोर शासकीय वाहनात थांबुन राहिले होते . त्यानंतर मी व पंच नं . 1 श्री वराडे असे आम्ही माझे कडील वाहनाने संगमनेर शहर पोलीस स्टेशन चे बाहेर माझे वाहन पार्क करून आम्ही पोलीस स्टेशनचे आत जावुन पीएसआय राणा परदेशी यांच्या कबीन मध्ये जावुन त्यांची भेट घेतली त्यावेळी त्यांचेशी चोरीच्या गुन्हया बाबत चर्चा होवुन पीएसआय राणा परदेशी यांनी मला गुन्हयात आरोपी न करण्याच्या मोबदल्यात 2,00,000/ - रूपयाची लाचेची मागणी करून तडजोडअंती 1,00,000 / - रूपयेची लाचेची रक्कम त्यांनी फोन केल्यानंतर अगर समक्षा भेटीच्या वेळेस देण्याबाबत सांगुन माझेकडे लाच मागीतली ,त्यानंतर मी व पं . 1 श्री . राजे आम्ही मागे वाहनाने संगमनेर बस स्टँड समोर परत आलो . त्यावेळी माझेकडील व्हाईस रेकर्डर ताब्यात घेवून बंद के ले व त्यानंतर पोलीस उपअधीक्षक साहेब यांनी मला व पंच.1 श्री . वराडे आम्हाला घडलेली हकीकत विचारली असता आम्ही वरील प्रमाणे सांगीतलेल्या हकिगती वरून व व्हाईस रेकर्डरमध्ये माझे व पीएसआय राणा परदेशी मध्ये रेककॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधिक्षक श्री जाधव , पंच , सापळा पथकातील सदस्यांनी ऐकल्यानंतर माझेकडे पीएसआय राणा परदेशी यांनी मला गुन्हयात आरोपी न करण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे 1,00,000 / - रूपये लाचेची रक्कम त्यांनी फोन केल्यानंतर अगर समक्ष भेटेल त्यावेळी देण्याबाबत सांगुन लाच मागत असल्याची सर्वची खात्री झाली . त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा संगमनेर स्टँड समोर उभे असलेल्या शासकीय वाहनात टंलिखीत करण्यात आलेला आहे . त्यानंतर आज दिनांक 3/11/2020रोजी सकाळी 10/00 वा.चे सुमारास पीएसआय राणा परदेशी यांनी मला फोन करून पैसे घेवुन दुपारी 14:00 वाजे पावेतो संगमनेर शहर पोलीस स्टेशन येथे येण्याबाबत मला सांगीतले होते . त्याबाबत मी पोलीस उपअधीक्षक श्री विजय जाधव साहेब यांना हकिगत सांगीतली असता त्यांनी मला आज 10:30 वाजे पर्यत लाचेची रक्कम घेवुन अँन्टी करप्शन ब्युरो , नाशिक कार्यालयात हजर राहण्याबाबत सांगीतल्याने मी अँन्टी करप्शन ब्युरो , नाशिक कार्यालयात हजर झालो . त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री जाधव यांचे सुचनेप्रमाणे मी दोन पंचासमक्ष लोकसेवक यांना दयावयाची 1,00,000 / - रूपये नसल्याने 2000 रू दराव्या 25 नोटा असे एकुण 50,000 / -रुपये हजर केले . तसेच पोलीस उप अधीक्षक श्री जाधव यांनी कार्यालयात उपलब्ध असलेल्या 2000 रू . दराच्या 25 मोटा 50,000/ - हजार रूपयेच्या नकली नोटा घेतल्या . अशा एकुण 1 लाख रूपयेच्या सर्व 50 नोटांना पोहेकाँ / डांगे यांचे करवी अ.पा ल.पा. लातुन त्या नोटा माझे पण्टच्या पुढील उजवे बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या व पोहकाँ / डांगे यांना सापळा पथकातुन वगळयात आले . त्यानंतर मी व पंच श्री वराडे असे लाचेच्या रक्कमेसह श्री . पीएसआय राणा परदेशी यांनी आज दिनांक 03/11/2020रोजी संगमनेर पोलीस स्टेशन येथे भेटण्यासाठी बोलाविले असल्याने मी माझे कारने व पोलीस उप अधीक्षक श्री जाधव व सापळा पथक असे शासकिय वाहनाने पंच स्टापसह लाप्रति नाशिक कार्यालयातून निघून संगमनेर शहरातील स्टेडीयम समोरील पार्किंगमध्ये येवून थांबलो . दरम्यानच्या काळात पीएसआय राणा परदेशी यांनी मला फोन करून संगमनेर शहरातील कोर्टाच्या समोरील थोरात क्रिडा संकुलन समोर लाचेची रक्कम घेवुन बोलाविले असल्याने मला व पंच क .1 श्री . वराडे आम्हाला श्री जाधव साहेब यांनी योग्य त्या सुचना देवुन व्हाईस रेकर्डर सह मला व पंच 1 श्री . वराडे असे दोघांना रवाना करून स्टेडीयम व पार्किग परिसरात सापळा आयोजीत केला . त्याप्रमाणे मी व पंच .1वराडे यांचेसह थोरात क्रिडा संकुल समोर उभे होते .त्यावेळी पीएसआय राणा परदेशी हे त्यांचे मोटर सायकलवर सदर ठिकाणी आले असता त्यांची भेट घेवुन कामा बाबत चर्चा केली असता त्यांनी हाताच्या इशा-याने लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम त्यांचे सोबत दुस - या मोटर सायकल वरून आलेला इसम विशाल रविंद्र पावसे त्यांचेकडे देण्यास पंच साक्षीदारा समक्ष सांगीतले असता इसम नामे विशाल रविंद्र पावसे वय 31 , रा साईश्रध्दा चौक , संगमनेर यांनी पीएसआय राणा परदेशी यांचे सांगणेवरून लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे . सदर कारवाई बाबत सविस्तर सापळा पुर्व / यशस्वी सापळा पंचनामा पोलीस उपअधीक्षक श्री विजय जाधव यांनी शासकिय विश्रामगृह , संगमनेर येथे केला आहे . तरी दि . 31/10/2020 रोजी पीएसआय राणा परदेशी यांनी चोरीच्या गुन्हयात आरोपी न करण्याच्या मोबदल्यात माझेकडे 2,00,000 / - रूपयाची लाचेची मागणी करून तडजोडती 1,00,000 / - रूपये लाचेची रक्कम दिनांक 3/11/2020 रोजी 14:15 वाजता थोरात क्रिडा संकुलच्या गेटच्या बाजुला , संगमनेर येथे पंच साक्षीदार यांचे समक्ष इसम नामे विशाल रविंद्र पावसे , रा साईश्रध्दा चौक , संगमनेर यांचे मार्फतीने स्विकारली . अशाप्रकारे पीएसआय राणा प्रतापसिंग परदेशी , वय 31 वर्ष , नेमणुक - संगमनेर शहर पोलीस स्टेशन , रा फ्लँट नं , 34 , मटाले सोरासायटी , कामटवाडारोड , नाशिक व विशाल रविंद्र पावसे , वय 31 वर्ष , व्यवसाय - व्यापार , रा साई श्रध्दा चौक , संगमनेर , जि . अहमदनगर यांनी स्वतःचे पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेण्याचे हेतुने कायदेशिर परिश्रमीका खेरीज अन्य पारितोषण म्हणुन लाचेची मागणी करून लाचेची रक्कम विशाल रविंद्र पावसे यांचे मार्फतीने स्विकारली म्हणुन त्यांचे विरूद्ध लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम सन 1 9 88 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे . माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचून पाहिली असुन ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे , समक्ष हि फिर्याद दिली.

पोलीस निरीक्षक

...मनेर शहर पो. स्टे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentione**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** ABHAY MUKUNDRAO PARMAR(I (Inspector)) / **or (कि**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** ABHAY MUKUNDRAO PARMAR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे ... संगमनेर शहर पोलीस स्टेशन

सत्यप्रत असे

पोलीस निरीक्षक
संगमनेर ... स्टेशन



Scanned with CamScanner